अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई – ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :– ०१.०२.२०२३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०५/२०२३ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम -१९८८ |
| आरोपी आलोसे | अजितकुमार सामबडे, प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | **रुपये ३०,००,०००/- (अक्षरी रु. तीस लाख)** |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | **रुपये १५,००,०००/- (अक्षरी रु. पंधरा लाख)** |
| थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी यांना दि पक्का रंग साडी को. ऑप. असोसिएशन लि. मालेगाव येथे शेअर होल्डर होण्याकरीता शेअर्सची फी भरून संस्थेकडे अर्ज केला होता. सदर अर्ज फेटाळल्यामुळे फिर्यादी यांनी सदरचे अर्जाबाबत प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई यांचेकडे अपिल दाखल केले होते. सदर अपिलाच्या अनुषंगाने फिर्यादी व इतर २० लोक यांनी मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन देखील दाखल केले होते.<br>सदर रिट पिटीशनवर मा. उच्च न्यायालयाने प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई यांना दिनांक ०४/०२/२०२३ रोजी पूर्वी निकाली काढावी असे आदेशित केले असल्याने सदर अर्जावर फिर्यादी यांच्या बाजूने निकाल देणे तसेच संस्थेचा सभासद करून देण्याकरीता यातील आरोपीत लोकसेवकाने फिर्यादीकडे रु ३०,००,०००/- रक्कमेची मागणी केली. फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी दिनांक ३१/०१/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे प्रत्यक्ष हजर राहून लेखी तक्रार अर्ज दिला.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि.३१/०१/२०२३ रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली असता, पडताळणी मध्ये यातील आरोपी लोकसेवकाने फिर्यादी यांचेकडे अपिल अर्जावर त्यांच्या बाजूने निर्णय देण्याकरीता रु.३०,००,०००/- रुपयाची मागणी करुन दिनांक ०१/०२/२०२३ रोजी सदरच्या रक्कमेपैकी रु.१५,००,०००/- आणुन देण्यास सांगितल्याने लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले.<br>त्यानुसार आज दि. ०१/०२/२०२३ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना रु. **१५,००,०००/- (अक्षरी रु. पंधरा लाख) लाचेची रक्कम फिर्यादी यांच्याकडून स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.** म्हणून नमूद आरोपीत लोकसेवक यांचे विरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**मार्गदर्शन अधिकारी :- श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.**

01/02/2023
( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अथवा लाच मागितल्या बाबतबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in, मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB

Scanned with OKEN Scanner